# उ प सं हा र

## उ प सं हा र

स्वा.वि.दा. सावरकर हे भारतीय राजकीय विचारांच्या विकासामध्ये महत्त्वाची भूमिका बजाविणारे विचारवंत होते. भारताच्या स्वातंत्र्य लढयात त्यांनी भाग घेतला होता. नंतरच्या काळात त्यांनी हिंदु राष्ट्रवादाचा पुरस्कार करुन भारतामध्ये "हिंदु राष्ट्रवादाची" मुहूर्तमेढ रोवली. त्यामुळे ते हिंदु राष्ट्रवादाचे पुरस्कर्ते ठरले. परंतु त्यांच्या सुरुवातीच्या राजकीय जीवनात म्हणजे अभिनव पर्व काळात १९१० पर्यंत सावरकर हे "हिंदी राष्ट्रवादाचे" पुरस्कर्ते होते. या राष्ट्रवादामध्ये त्यांनी व्यापक राष्ट्रीय भूमिका स्वीकारलेली होती. त्यांच्या राजकीय विचारांवर प्रख्यात इटालियन विचारवंत जोसेफ मॅझिनी यांच्या विचारांचा प्रभाव होता. मॅझिनीचा राष्ट्रवाद, उच्च नैतिक मूल्यांनी प्रभावीत झालेला होता. सावरकरांनी त्यांच्या त्या काळातील वेगवेगळ्या पुस्तकातून आणि लेखांतून "हिंदी राष्ट्र वादाचा" पुरस्कार केला. त्यांचे राष्ट्रवादी विचार त्या काळातील जहाल राष्ट्रवादी विचारवंताच्या विचारांसारखे होते. फक्त राष्ट्रीय स्वातंत्र्यासाठी सावरकर सशस्त्र क्रांतीचा पुरस्कार करीत नव्हते.

प्रस्तुत प्रबंधामध्ये सावरकरांच्या हिंदी राष्ट्रवादाचा अभ्यास करण्यात आला आहे. "हिंदी राष्ट्रवादी" विचार त्यांनी त्यांच्या राजकीय जीवनाच्या पहिल्या (अभिनव पर्व १९१० पर्यंत) अवस्थेमध्ये मांडला. प्रस्तुत प्रबंधाचा उद्देश सावरकरांच्या "हिंदी राष्ट्रवादी" विचारांची सुसंबध, पध्दतीशीर आणि व्यवस्थित मांडणी करणे हा आहे. कारण एकूण सावरकर अभ्यासामध्ये त्याकडे दुर्लक्ष झालेले आहे. त्यासाठी सावरकरांनी या विषयावर लिहिलेली पुस्तके, लेख, कविता व इतर पद्य रचना यांची मदत घेण्यात आलेली आहे. या साधनातून उपलब्ध होणाऱ्या राजकीय

विचारांची मांडणी आणि विश्लेषण ऐतिहासिक दृष्टिकोणातून केले आहे.

अ) सारांश -

या प्रबंधाच्या पहिल्या प्रकरणात विषयाची ऐतिहासिक पार्श्वभूमी वर्णिली आहे. या प्रकरणात इंग्रजी राजवटीचे परिणाम, भारतातील तत्कालीन राजकारण, सावरकरांचे संक्षिप्त जीवन चरित्र आणि सावरकरांवर पडलेले विविध प्रभाव यांचे वर्णन करण्यात आले आहे. भारतात व्यापारासाठी आलेल्या ईस्ट इंडिया कंपनीचे १७५७ च्या प्लासीच्या युध्दाने राजकीय सत्तेत रूपांतर झाले. त्यानंतर कंपनीने आपल्या फायद्यासाठी सत्ता विस्ताराचे धोरण स्वीकारले. यासाठी इंग्रजांनी भारतीयांशी युध्दे करून तैनाती, फौजेचा वापर करून, दत्तक वारस नामंजूर करून संपूर्ण भारत जिंकून घेतला, आणि स्वार्थासाठी सत्तेचा वापर केला. त्यामुळे इंग्रज सत्तेचे भारतात अनेक दुष्परिणाम घडून आले. यातूनच १८५७ मध्ये भारतीयांनी इंग्रजांविरूध्द स्वातंत्र्य युध्द घडवून आणले. या युध्दाने भारतातील ईस्ट इंडिया कंपनीची सत्ता लय पावली आणि राणी व्हिक्टोरियाची सत्ता देशात सुरू झाली. परंतु या राजवटीतही इंग्रजांनी भारतीयांवर अन्याय, जुलूम करण्यास सुरूवात केली. म्हणून या अन्यायाचे परिमार्जन करण्यासाठी भारतात १८८५ मध्ये राष्ट्रीय कॉंग्रेसची स्थापना झाली. राष्ट्रीय कॉंग्रेसच्या ध्येयधोरणाच्या मतभेदातून कॉंग्रेसमध्ये मवाळ व जहाल असे दोन गट उदयास आले. मवाळ गटाने समाजसुधारणेसाठी इंग्रज सत्ता भारताला वरदान आहे असे मानून इंग्रज सत्तेचे समर्थन केले. म्हणून सावरकर या गटाला "ब्रिटिशनिष्ठ" असे संबोधतात. जहाल गटाने समाजसुधारणेपेक्षा राजकीय स्वातंत्र्याला महत्त्व दिले. त्यांच्या मते इंग्रज सत्ता भारताला वरदान नसून तो एक शाप आहे. कारण इंग्रज कपटी व स्वार्थी असल्याने ते भारताचा विकास करणार नाहीत.

म्हणून देशाच्या विकासासाठी राजकीय स्वातंत्र्य अगोदर मिळविले पाहिजे. त्यासाठी त्यांनी नि:शस्त्र प्रतिकाराचा मार्ग स्वीकारला. म्हणूनसावरकर या गटाला "स्वदेशनिष्ठ" असे संबोधतात. या वातावरणात सावरकर लहानाचे मोठे झाले. सावरकरांच्या बालमनावर रामायण, महाभारत या पौराणिक ग्रंथाचा, छ. शिवाजी महाराज, राणा प्रताप, गुरु गोविंदसिंह,समर्थ रामदास इत्यादी ऐतिहासिक व वंत पुरुषांचा तसेच आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके, चांफेकर बंधू, पंडीत शामजी वर्मा, जोसेफ मॅझिनी इत्यादी क्रांतिकारकांच्या विचारांचा प्रभाव पडला. आणि त्यांनी राष्ट्रीय स्वातंत्र्य संग्रामात उडी घेतली.

दुस-या प्रकरणात सावरकरांचे "अभिनव भारत" पर्वातील राजकीय विचारांची चर्चा केली आहे. स्वा. सावरकरांच्यावर क्रांतिकारकांच्या विचारांचा प्रभाव पडल्याने त्यांनी जहालवादाचे पुढचे पाउल म्हणून राष्ट्रीय स्वातंत्र्यासाठी सशस्त्र क्रांतीचा मार्ग स्वीकारला. त्यांच्या मते भिक्षा मागून वा नि:शस्त्र प्रतिकाराच्या मार्गाने स्वातंत्र्य मिळणार नाही. त्यासाठी सशस्त्र क्रांतीचाच मार्ग स्वीकारला पाहिजे. यासाठी त्यांनी "मित्रमेळा" आणि "अभिनव भारत" या क्रांतीकारी संघटनांची स्थापना केली. या संघटनाद्वारे त्यांनी राष्ट्रीय स्वातंत्र्यासाठी भारतीयांत प्रथम मन क्रांति व नंतर वास्तविक क्रांति व्हावी म्हणून सशस्त्र क्रांतीवादी विचारांचा प्रसार केला. तसेच ऐतिहासिक पुरुषांचे उत्सव, परदेशी मालाची होळी, सार्वजनिक भाषणे इत्यादीद्वारे आपल्या विचारांचा प्रसार केला. सावरकर हे मोठे कवि होते.आणि स्वातंत्र्यावर त्यांनी अनेक कविता लिहिल्या. त्यांनी राष्ट्रीय स्वातंत्र्यासाठी भारतीयांस क्रांतीची भावना

उद्दीपीत व्हावी म्हणून, स्वदेशीचा फटका, चाफेकर नि रानडे यांजवरील फटका, वृषोक्ति, श्री शिवाजी महाराजांची आरती, स्वतंत्रतेचे स्तोत्र, सिंहगडाचा पोवाडा, श्री बाजीप्रभू देशपांडे यांचा पोवाडा अशा अनेक पद्यरचना लिहिल्या. या पद्यरचनेतून त्यांनी स्वातंत्र्यासाठी लढ्याचा निर्धार व्यक्त केला.

तिसऱ्या प्रकरणात मॅझिनीच्या विचारांची चर्चा करण्यात आली आहे. सावरकर लंडनला गेल्यानंतर तेथे मॅझिनीच्या वाङ्मयातील राष्ट्रवादी विचारांनी अधिकच प्रभावित झाले. कारण त्यांनी मॅझिनीच्या आणि स्वतःच्या ध्येयात, विचारांत, कार्यपध्दतीत बरेच साम्य आढळून आले. तसेच इटली आणि भारत यांच्या परतंत्र स्थितीतही बरेच साम्य आढळले. अशा स्थितीत इटलीने मॅझिनीच्या सशस्त्र क्रांतीच्या विचारांनी प्रभावित होऊन ऑस्ट्रियाविरूध्द क्रांती केली आणि स्वातंत्र्य मिळविले. तेव्हा भारतीयांनी इटलीप्रमाणेच स्वातंत्र्यासाठी इंग्रजांविरूध्द सशस्त्र क्रांती करून भारताचे स्वातंत्र्य मिळवावे, या हेतूने त्यांनी भारतीयांना क्रांतीची प्रेरणा देणारा "जोसेफ मॅझिनी" हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथात त्यांनी मॅझिनीच्या मुखातून राष्ट्रवादी विचार मांडले.

सावरकरांच्या मते, मॅझिनीने राष्ट्रवादाची मांडणी करताना राष्ट्रीय स्वातंत्र्यासाठी सशस्त्र क्रांतीच केली पाहिजे. यासाठी मॅझिनीने सशस्त्र क्रांतीचा मार्ग स्वीकारला. त्याच्या मते भिक्षां देहीने वा निःशस्त्र प्रतिकाराचे मार्गाने राष्ट्रीय स्वातंत्र्य मिळणार नाही. त्यासाठी सशस्त्र क्रांतीच केली पाहिजे. यासाठी मॅझिनीने "तरुण इटली" या क्रांतीकारक संघटनेची स्थापना केली. या संघटनेद्वारे सशस्त्र क्रांतीसाठी इटालियन

लोकांत प्रथम मनपरिवर्तन व नंतर शरीरपरिवर्तन घडवून आणण्यासाठी अनेक क्रांती लेख प्रसिध्द केले. त्याने आपल्या राष्ट्रवादाची स्वातंत्र्य, समता, राष्ट्रैक्य, लोकसत्ता, विश्वबंधुत्व इत्यादी तत्त्वे प्रतिपादन केली. या तत्वांच्या प्राप्तीसाठी राजकारण हे नीतीला धरुन असावे. राजकारणातील प्रधान कर्तव्ये म्हणजे स्वातंत्र्य संपादन होय. इतर सर्व कर्तव्य व्यक्तीकडून व्यवस्थित रीतीने पार पाडण्यासाठी स्वदेश स्वातंत्र्य अगोदर मिळविले पाहिजे. स्वातंत्र्य प्राप्तीसाठी स्वातंत्र्ययुध्द गनिमीकावा पध्दतीने करावे. प्रबल परकीय शत्रूचा पराभव करण्यासाठी गनिमीकावा युध्द पध्दतीच उपयुक्त ठरते. गनिमीकावा अजिंक्य व अविनाशी आहे. स्वातंत्र्य मिळेपर्यंत पुन्हा पुन्हा गनिमीकावा पध्दतीने युध्द करावे. स्वातंत्र्य युध्दाची उठावणी देशात एकाच वेळी करावी.

मॅझिनीच्या या राष्ट्रवादी विचारांनी प्रभावित होऊन इटालियन लोकांनी ऑस्ट्रियाविरुध्द सशस्त्र क्रांती केली आणि इटलीचे स्वातंत्र्य मिळविले. याप्रमाणेच भारतीयांनी संघटीत होऊन इंग्रजांविरुध्द स्वातंत्र्ययुध्द करावे आणि भारताचे स्वातंत्र्य मिळवावे असे सावरकरांचे मत होते.

चौथ्या प्रकरणात सावरकरांच्या १८५७ चे स्वातंत्र्यसमर या ग्रंथातील राष्ट्रवादी विचारांची चर्चा करण्यात आली आहे. १९०७ साली १८५७ च्या क्रांतीला पन्नास वर्षे पुर्ण होणार होती. या काळात भारतात इंग्रजांविरुध्द असंतोषाची लाट निर्माण झाली. होती. या स्फोटक परिस्थितीचा लाभ उठवून भारतीयांनी १८५७ च्या क्रांतीप्रमाणेच इंग्रजांविरुध्द पुन्हा स्वातंत्र्य युध्द करावे, म्हणून भारतीयांत क्रांतीची चेतना निर्माण करण्यासाठी सावरकरांनी १८५७ च्या क्रांतीचे विवेचन १८५७ चे स्वातंत्र्यसमर या ग्रंथात केले. त्यांच्या मते १८५७ ची क्रांती ही भारतीयांनी स्वधर्म व

स्वराज्य रक्षण या दोन प्रमुख तत्वांसाठी घडवून आणली. त्यामुळे ही क्रांती भारतीय स्वातंत्र्याचा महान संग्राम होय. या क्रांतीचे प्रमुख कारण म्हणजे इंग्रजांनी भारतीयांचे स्वधर्म व स्वराज्य बुडविण्याचे हेतु-पुर्वक स्वीकारलेले धोरण होय. त्यामुळे स्वधर्म व स्वराज्य रक्षणाच्या वैचारिक प्रेरणेतून भारतीयांनी ही क्रांती घडवून आणली. या स्वातंत्र्य युध्दात हिंदी सैनिक, संस्थानिक आणि हिंदु-मुस्लीम अशा सर्वच हिंदी लोकांनी स्वधर्म व स्वराज्य रक्षणासाठी "जिंकू किंवा मरू" या दृढ निर्धा-राने इंग्रजांविरूध्द प्राणपणाने लढा दिला. त्यामुळे या युध्दाला राष्ट्रीय स्वातंत्र्ययुध्दाचे स्वरूप प्राप्त झाले. इंग्रज लोक हेतुपुर्वक आपला स्वधर्म व स्वराज्य बुडवित आहेत असे देशातील हिंदु-मुस्लीम बांधवांच्या लक्षात येताच त्यांनी परस्परातील परंपरागत वैर विसरून ऐक्याच्या, सहकार्याच्या व बंधुत्वाच्या भावनेने एकत्र येऊन इंग्रजांविरूध्द स्वधर्म व स्वराज्य, रक्षणा-साठी प्राणपणाने लढा दिला. त्यामुळे या स्वातंत्र्ययुध्दात हिंदु-मुस्लीम देशबांधवात ऐक्य निर्माण होऊन धर्मभेद लोप पावला. परंतु या स्वातंत्र्ययुध्दात काही लोकांनी स्वदेशद्रोह व विश्वासघात केल्याने भारती-यांचा पराभव झाला. हे स्वातंत्र्य युध्द अयशस्वी का ठरले याचेही सावरकरांनी विश्लेषण केले आहे. तेव्हा या स्वातंत्र्ययुध्दात जे देशवीर प्राणपणाने लढले त्या देशवीरांच्या पराक्रमाची प्रेरणा घेऊन भारतीयांनी राष्ट्रीय स्वातंत्र्यासाठी १८५७ च्या स्वातंत्र्ययुध्दाप्रमाणेच पुन्हा इंग्रजां-विरूध्द सशस्त्र क्रांती करावी आणि भारताचे स्वातंत्र्य मिळवावे असे सावरकरांचे सांगणे होते.

पाचव्या प्रकरणामध्ये सावरकरांच्या हिंदी राष्ट्रवादाची टीकात्मक समीक्षा करण्यात आली आहे. सावरकरांचा या काळातील राष्ट्रवादी विचार मॅझिनीच्या विचारांनी प्रभावित झालेला होता. सावरकरांच्या मते

भारतीय राष्ट्र हे भारतात राहाणा-या व भारतावर प्रेम करणा-या सर्व धर्मांच्या लोकांचे राष्ट्र आहे. राष्ट्र म्हणजे सर्व संमतीने एकजीव झालेले व एकाच शासनपध्दतीने शासित असलेले लोक होत. हे सर्व लोक एका विशिष्ट प्रदेशात राहातात, ही मॅझिनीची राष्ट्रवादाची व्याख्या त्या काळात त्यांना मान्य होती. राष्ट्राचा आधार भुप्रदेश आहे, तो एका विशिष्ट एका धर्माचे लोक नाहीत असे प्रादेशिक राष्ट्रवादी मानतात. सावरकरांचाही त्यावर विश्वास होता. या काळात सावरकर धर्माला महत्त्वाचे स्थान देतात, पण धर्म हा राजकारणातील एक साधन म्हणून न वापरता धर्म हे राजकारणाला नैतिक स्वरुप देणारे तत्व आहे अशी त्यांची भूमिका होती. हिंदु आणि मुसलमान यांनी १८५७ च्या लढयात राष्ट्रीय स्वातंत्र्यासाठी संघर्ष केला. या स्वातंत्र्य लढयाचे विश्लेषण सावरकरांनी हिंदी राष्ट्रवादी भूमिकेतून केले आहे. हिंदी राष्ट्रवादाचा उद्देश स्वातंत्र्य, समता, लोकशाही यांची स्थापना करणे हा होता. पण १९२३ नंतर मात्र सावरकरांनी हिंदु राष्ट्रवादाचा पुरस्कार सुरु केला. हिंदु आणि हिंदी राष्ट्रवादातील फरकाची या प्रकरणात शेवटी चर्चा करण्यात आली आहे.

## टीकात्मक विवेचन :

प्रस्तुत प्रबंधात स्वा. सावरकरांच्या सुरुवातीच्या राष्ट्रवादी विचारांचा अभ्यास करण्यात आला आहे. या काळामध्ये सावरकर संयुक्त भारतीय संस्कृती-वर आधारलेल्या हिंदी राष्ट्रवादाचे पुरस्कर्ते होते. त्यांच्या या काळातील विचारांवर जोसेफ मॅझिनीच्या राष्ट्रवादी विचारांची गडद छाप त्याचप्रमाणे त्या काळात प्रस्तुत असणारे जहालराष्ट्रवादी विचारही त्यांना प्रभावीत करीत असत. अंदमानला जाण्यापूर्वी १९१० पर्यंत सावरकरांनी हिंदी राष्ट्र-

वादाचा पुरस्कार सुरु केला. हिंदुस्थान हा देश हिंदुंचा आहे व या देशातील राहणारे इतर अहिंदू विशेषत: मुसलमान या राष्ट्राचे घटक नाहीत अशी त्यांनी भूमिका मांडली.

सावरकरांच्या हिंदी राष्ट्रवादाची मीमांसा करीत असताना खालील मुद्यांचा आपण विचार केला पाहिजे.

१. स्वा. सावरकरांनी भारतीय स्वातंत्र्यासाठी देशातील सर्व लोकांनी संघटीतपणे प्रयत्न करावा आणि इंग्रजांना हाकलून लावावे असे सांगितले त्याकाळात त्यांच्या देशप्रेमाचा आधार हिंदी राष्ट्रवाद हा होता.

२. सावरकरांनी "हिंदी राष्ट्रवादात" राजकारणाला धर्माच्या नैतिकतेचे अधिष्ठान दिले. त्याच्या मते राजकारण म्हणजे समाजाची स्वदेशाची व स्वराष्ट्राची दास्यमुक्तता व संवर्धन होय. त्याकडे दुर्लक्ष करणे म्हणजे मानवजातीवर आलेले संकट निमूटपणे पण पाहण्याचे पाप करणे होय. त्यामुळे सावरकरांनी राजकारणाला नैतिकता प्राप्त करुन देण्यासाठी धर्म हा घटक महत्त्वाचा मानला.

३. सावरकरांनी हिंदी राष्ट्रवादात, स्वातंत्र्य, समता, लोकशाही, बंधुता, राष्ट्रैक्य, विश्वबंधुत्व इत्यादी पुरोगामी आणि मूलभूत तत्वांचा पुरस्कार केला आणि त्यांच्या प्राप्तीसाठी सर्व भारतीयांनी इंग्रजांविरुध्द सशस्त्र क्रांती केली पाहिजे असे विचार मांडले.

४. सावरकरांनी "हिंदी राष्ट्रवादाची मांडणी प्रदेशाधिष्ठीत केली आहे. त्यांच्या मते राष्ट्र म्हणजे सर्व संमतीने एकजीव झालेले व एकाच शासनपध्दतीने शासीत असलेले सर्व लोक होत. हे मॅझिनीचे विचार मान्य केले. त्यात त्यांनी कोणत्याही धर्माच्या लोकांना वगळले नाही.

५. सावरकरांनी "हिंदी राष्ट्रवादात" हिंदु-मुस्लीम ऐक्यावर भर दिला आहे. कारण हिंदु-मुस्लीम ऐक्याने देशाच्या सामर्थ्यात वाढ होऊन स्वातंत्र्यप्राप्ती लवकर मिळेल असे त्यांना वाटत होते. १८५७ च्या लढाईत हे ऐक्य आपणास दिसत होते असे सावरकरांचे सांगणे होते.

सावरकरांच्या हिंदी राष्ट्रवादी भूमिकेमध्ये स्वधर्म संरक्षणाला महत्त्वाचे स्थान होते. पण त्यामध्ये सर्वच लोकांच्या स्वधर्माचा समावेश होत होता. फक्त हिंदुंच्याच धर्माचा समावेश होत नव्हता. त्यामुळे त्यांची हिंदी राष्ट्रवादाची भूमिका जास्त व्यापक होती. नंतरच्या काळात सावरकर जास्त विज्ञाननिष्ठ बनले. त्यांच्या विचारांवर स्पेन्सर इ. विचारवंतांचा प्रभाव जास्त गडद झाला. पण सामाजिक क्षेत्रात व्यापक भूमिका घेत असताना राजकीय क्षेत्रात मात्र त्यांनी हिंदु राष्ट्रवादाची अशास्त्रीय भूमिका घेतली.

•••••••